**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.०९/०४/२०२६

## डिजिटल जनगणनेसाठी वसई विरार शहर महानगरपालिका सज्ज ;

## तीन दिवसीय प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

देशाच्या इतिहासातील पहिली डिजिटल जनगणना ठरणाऱ्या जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. कार्यालयात दि. ६ एप्रिल ते १६ एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय विशेष प्रशिक्षणच्या पहिल्या बॅच मधील क्षेत्रीय प्रशिक्षकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जनगणना कशी प्रभावीपणे पार पाडावी याचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणात डिजिटल डेटा एन्ट्री, मोबाईल ॲपचा वापर, तसेच CMMS पोर्टलवरील कामकाज याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह माहिती देण्यात आली. जनगणना कार्यालयातील श्री संजय नाईक, आणि मास्टर ट्रेनर डॉ महादेव दिनकर इरकर यांनी सादरीकरणाद्वारे घरयादी व घरगणना प्रक्रिया, तसेच प्रगणक व पर्यवेक्षक नियुक्तीबाबत मार्गदर्शन केले.

यंदाची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार असल्याने मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलन, डेटा अचूकता आणि नागरिकांशी संवाद साधताना घ्यावयाची आवश्यक काळजी यावर विशेष भर देण्यात आला आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या जनगणना प्रक्रियेची धुरा मा.आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी श्री.पृथ्वीराज बी.पी. (भा.प्र.से.), अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे आणि उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी श्रीमती हर्षला राणे यांच्या नेतृत्वाखाली पार पडणार आहे.

जनगणना २०२७ ही देशाची १६ वी जनगणना असून ती अनेक अर्थाने ऐतिहासिक ठरणार आहे. यामध्ये प्रथमच नागरिकांना स्व-गणना (Self Enumeration) करण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हा पर्याय १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत उपलब्ध असेल. त्यानंतर १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान प्रत्यक्ष घरयादी व घरगणना संदर्भात क्षेत्रीय कार्य राबविण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात नागरिकांची सविस्तर सामाजिक व आर्थिक माहिती संकलित केली जाणार आहे.

डिजिटल माध्यमातून जलद माहिती प्रसार, जात प्रगणना, स्व-गणना पोर्टल आणि अचूक डेटा संकलन ही या जनगणनेची ठळक वैशिष्ट्ये ठरणार आहेत.

दरम्यान, वसई विरार शहर महानगरपालिकेतील सर्व नागरिकांनी जनगणनेसाठी घरी येणाऱ्या प्रगणकांना अचूक व प्रामाणिक माहिती देऊन या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन मा.आयुक्त श्री. पृथ्वीराज बी .पी . यांनी केले आहे.

दि.०८ एप्रिल २०२६ रोजी पहिल्या बॅचच्या प्रशिक्षणाची सांगता अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. सर्व क्षेत्रीय प्रशिक्षकांना या राष्ट्रीय कार्यात तत्परतेने आपली सेवा द्यावी व संपूर्ण वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील घरी यादी घरगणनेचे काम अतिशय दर्जेदार व विश्वसनीय करावे असे आवाहन अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे यांनी करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.